# शोधते तुला कधीची

मी चांदण्यात उभी
स्मरते तुला मनाशी
तूं येणार म्हणुनी
शोधते तुला कधीची

मनीषा माझ्या मनीची
सख्या तव मिलनाची
तू दिसावा म्हणुनी
शोधते तुला कधीची

रात्र रात्र जागूनी
पुजते तुला स्मरुनी
तू येणार म्हणुनी
शोधते तुला कधीची

संगे रात्रहि जागते
चांदण्यात नाहते
तू येशील म्हणुनी
शोधते तुला कधीची

– पद्माकर चित्रे

('बोल अंतरीचे' या कवितासंग्रहातून)